**महाराष्ट्र राज्याच्या प्रत्येक जिल्ह्यामध्ये क्रीडा दिन व क्रीडा सप्ताह साजरा करणे. निधी वितरणाबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : निवियो २०१८/प्र.क्र.१३०/क्रीयुसे -३**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२
तारीख : १९ मार्च, २०१९.

वाचा:-

१) शासन निर्णय समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग क्र. राक्रीधो १०९६/ प्र.क्र.३३०/क्रीयुसे-१ दि. ३१ जुलै, १९९७.
२) वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३, दि.२५ जानेवारी, २०१९.
३) क्रीडा व युवक सेवा पुणे यांचे पत्र क्रमांक .निधी वितरण/योजना-१७३८/२०१८-१९/का-१०/६४०० दि.२१ फेब्रुवारी, २०१९.

**प्रस्तावना :-**

महाराष्ट्र राज्यातील क्रीडा संस्कृतीची जोपासना व जनतेत क्रीडा वातावरण निर्माण होण्याच्या उद्देशाने दरवर्षी राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात दि. १२ ते १८ डिसेंबर या कालावधीत क्रीडा सप्ताह साजरा करण्यांत येतो. यामध्ये विविध क्रीडाविषयक उपक्रम, स्पर्धा, खेळाडूंचा सत्कार, चर्चासत्रे, प्रदर्शने इ. चा समावेश होतो. तसेच केंद्र शासनाने निर्देशित केल्याप्रमाणे मेजर ध्यानचंद यांचा जन्मदिवस (२९ ऑगस्ट) हा राष्ट्रीय क्रीडा दिन म्हणून साजरा करण्यात येतो. यामध्ये मेजर ध्यानचंद यांच्या जीवनावर प्रकाश टाकणाऱ्या कार्यक्रमाचे/ व्याखानाचे आयोजन, क्रीडा विषयक शास्त्रोक्त माहिती, क्रीडा विषयक उपक्रम, रोडरेस /सायकल शर्यती इ. चे आयोजन करण्यात येते. सन २०१८-१९ या आर्थिक वर्षासाठी अर्थसंकल्पिय तरतूद रु.३.५० लक्ष मधून वित्त विभागाच्या दि.२/४/२०१८ च्या शासन परिपत्रकानुसार ७०% च्या मर्यादेत रू.२.४५ लक्ष इतक्या निधीच्या वितरणास शासन निर्णय क्र.निवियो-२०१८/प्र.क्र.१३०/क्रीयुसे-३, दि.११/६/२०१८ अन्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. वित्त विभागाच्या दि. २५/१/२०१९ च्या शासन परिपत्रकानुसार उर्वरीत १०% च्या मर्यादेतील रु.३५,०००/- (रु. पस्तीस हजार फक्त) इतका निधी वितरीत करण्याची बाब या नस्तीच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

महाराष्ट्र राज्यातील क्रीडा संस्कृतीची जोपासना व जनतेत क्रीडा वातावरण निर्माण होण्याच्या उद्देशाने दरवर्षी राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात क्रीडा सप्ताह व मेजर ध्यानचंद यांना जन्मदिवस साजरा करण्यांत येतो. यासाठी सन २०१८-१९ या वर्षाकरीता अर्थसंकल्पित तरतूद रु. ३.५० लक्ष पैकी वित्त विभागाच्या दि.२/४/२०१८ च्या शासन परिपत्रकास अनुसरुन ७०% च्या मर्यादेत रु.२.४५ लक्ष इतका निधी वितरीत करण्यात आला आहे. वित्त विभागाच्या दि. २५/१/२०१९ च्या शासन परिपत्रकानुसार उर्वरीत १०% च्या मर्यादेतील रु.३५,०००/- (रु. पस्तीस हजार फक्त) इतका निधी वितरीत करण्यास व सदर रक्कम आयुक्त, क्रीडा व युवक सेवा यांच्या अधिनस्त ठेवण्यास याद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

२. उपरोक्त संदर्भात होणारा खर्च "मागणी क्रमांक : ई-३, २२०४ क्रीडा व युवक सेवा-१०४, (२५)(०१) महाराष्ट्र राज्याच्या प्रत्येक जिल्ह्यामध्ये क्रीडा सप्ताह साजरा करणे (२२०४ १७३८) ५० इतर खर्च (वेतनेतर) या लेखाशिर्षाखालील मंजूर तरतूदीमधून भागविण्यात यावा. सदरचे अनुदान ज्या प्रयोजनासाठी मंजूर करण्यात आले आहेत त्याच प्रयोजनासाठी खर्च करण्यात यावे.

३. वित्त विभागाच्या संदर्भाधिन दि. २५/१/२०१९ च्या परिपत्रकातील सूचनांनुसार उपरोक्त तरतूद खर्च करण्याबाबतची कार्यवाही करण्यात यावी. यासाठी संबंधित जिल्हा क्रीडा अधिकारी यांना आंहरण व संवितरण अधिकारी तर आयुक्त (क्रीडा) यांना नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

४. सदरचा शासन निर्णय वित्त विभागाच्या दि.२/४/२०१८च्या परिपत्रकातील सूचनांना अनुसरून निर्गमित करण्यात येत आहे. सदर परिपत्रकाच्या परिशिष्टातील अनुक्रमांक ८ मध्ये नमुद अटींची पूर्तता होत आहे. सदर परिपत्रकाच्या परिशिष्टातील मुद्दा क्र. १,२,३,४,५,६ व ७ मधील बाबी सदर आदेशास लागू नाहीत.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०३२५१६४९५२४०२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Rajendra Shankarrao Pawar

Digitally signed by Rajendra Shankarrao Pawar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education and Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=679184b88f7019ef64ad6ddc2495ca280267c0d4755ce63fa70c45cf755d9373, cn=Rajendra Shankarrao Pawar
Date: 2019.03.25 16:53:53 +05'30'

(राजेंद्र पवार)
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा.मंत्री (शालेय शिक्षण व क्रीडा )यांचे खाजगी सचिव
२. मा.अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
३. आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, पुणे.
४. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.
५. महालेखापाल (लेखा व परिक्षा), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.
६. वित्त विभाग (व्यय-५), मंत्रालय, मुंबई.
७. सर्व विभागीय उपसंचालक, क्रीडा व युवकसेवा (संचालनालयामार्फत)
८. सर्व जिल्हा क्रीडा अधिकारी ( संचालनालयामार्फत )
९. वरीष्ठ जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे.
१०. निवडनस्ती, क्रीयुसे-३.